# पाच महिन्यांत चार मेट्रोगाड्यांचे आव्हान

## पहिल्या भूमिगत मार्गिकेसाठी वेगवान कामांची गरज

म. टा. खास प्रतिनिधी

**मुंबई :** राज्यातील पहिल्या भूमिगत मेट्रो ३ प्रकल्पासाठी आत्तापर्यंत पाच गाड्या मुंबईत पोहोचल्या आहेत. मात्र पहिल्या टप्प्यातील मार्गिका सुरू होण्यासाठी नऊ गाड्या जूनपर्यंत पोहोचणे अपेक्षित होते. त्या अद्याप न पोहोचल्याने पुढील पाच महिन्यांत चार गाड्या आणाव्या लागणार आहे. प्रस्तावित नियोजनानुसार, डिसेंबरपर्यंत ही मार्गिका सुरू होण्यासाठी तपासण्या व अन्य तांत्रिक बाबी पार पडणे आवश्यक आहे. त्यामुळेच ही मार्गिका सुरू करण्यासाठी वेगाने काम करण्याचे मोठे आव्हान मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनसमोर पुढील काळात असेल.

मेट्रो ३ ही आरे ते कफ परेड अशी ३३ किमी लांबीची मार्गिका आहे. त्यावर एकूण २७ स्थानके आहेत. त्यापैकी दहा स्थानकांचा आरे ते बीकेसी हा पहिला टप्पा डिसेंबरपर्यंत सुरू करण्याचे नियोजन आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही, हा प्रकल्प दिलेल्या मुदतीत पूर्ण करण्याचे आश्वासन दिले आहे. त्यानुसार पहिला टप्पा सुरू होण्यासाठी नऊ मेट्रोगाड्यांची आवश्यकता आहे. 'चौथ्या आणि पाचव्या गाड्यांचे डबे अलीकडेच आरे कारशेड सुविधा केंद्रात दाखल झाले. त्या डब्यांची आता जुळणी सुरू झाली आहे. त्यानंतर चाचण्या घेतल्या जातील. मात्र पहिला टप्पाची मार्गिका सुरू करण्यासाठी आणखी चार गाड्यांची आवश्यकता असेल,' अशी माहिती 'एमएमआरसी'ने दिली आहे.

एमएमआरसीने या मार्गिकेसाठी 'अल्स्टॉम' फ्रेंच कंपनीला ३१ गाड्यांचे कंत्राट दिले आहे. प्रत्येक गाडी आठ डब्यांची आहे. त्यांची बांधणी आंध्र प्रदेशातील श्री सिटी येथे होत आहे. पहिली गाडी जून, २०२२मध्ये ताब्यात आली होती. पहिला टप्पा डिसेंबरमध्ये सुरू होणे अपेक्षित असताना डब्यांची जुळणी व चाचण्यांचे हे काम नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करावे लागणार आहे.



### वळणदार रूळांमुळे विलंब

गाड्यांच्या डब्यांची जुळणी आणि चाचणी आरे कारशेडमध्ये होणार आहे. जिथे चाचणी होणार आहे, तिथे वळणावर रूळ टाकावे लागणार होते. त्यासाठी ११४ झाडे तोडावी लागणार होती. झाडकापणी परवानगी मिळण्यास विलंब झाल्याने रूळ उभारणीला वेळ लागला. परिणामी गाड्या वेळेत दाखल होऊ शकल्या नाहीत. आता मात्र काम प्रगतीपथावर आहे.